REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 6 | MARCH - 2018

# करमाळा तालुका : एक पर्यटनक्षेत्र

डॉ. माने ए.एस
इतिहास विभाग प्रमुख, श्री संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा, जि.सोलापूर.

## प्रस्तावना :-



सोलापूर जिल्हा हा दुष्काळी जिल्हा म्हणून ओळखला जातो. करमाळा तालुका हा सोलापूर जिल्हात येत असल्याने येथेही पावसाचे प्रमाण कमी आहे असे असले तरी महाराष्ट्रामध्ये करमाळा तालुक्याला ऐतिहासिक महत्व आहे. कारण करमाळा तालुक्याला ऐतिहासिक परंपरा लाभलेली आहे. सन १८६७ साली करमाळा तालुक्याची निर्मिती करण्यात आली. करमाळा शहराची ओळख ही भुसार मालाची बाजारपेठ म्हणून आहे. पर्यटनाच्या दृष्टीकोणातून करमाळा तालुक्याचा विकास व्हावा हा या शोधनिबंधा पाठीमागचा उद्देश आहे.

प्रत्येक गावाच्या नावापाठीमागे इतिहास हा दडलेला असतो तसाच प्रकार करमाळा नावाच्या इतिहासासंबधी सांगितला जातो तो म्हणजे दोन आख्यायिकाद्वारे करमाळा नावाच इतिहास तो असा की, करमाळा शहरात असलेल्या कमलाईदेवीच्या मंदिरामुळे करमाळा हे नाव पडले तर दूसरे असे की, हजरतकरमे मौल्ला हे मुस्लिम संत करमाळा भागात वास्तव्यास होते. त्यावेळी लोक जाती धर्माच्या पूढे जाऊन त्यांच्यावर श्रध्दा ठेऊ लागले अन् त्यांच्या या श्रध्देतूनच या नगराला नाव मिळाले करमाला. करमौल्लाचे पूढे करमाला आणि कालांतराने त्याचा अपभ्रंश होऊन करमाळा हे नाव नावारुपास आले.

या शोधनिबंधामध्ये करमाळा शहर व तालुक्यातील काही ऐतिहास गावाचा इतिहास मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

## उद्दिष्टे :-

१) स्थानिक इतिहासाची माहीती लोकांना व्हावी तसेच ऐतिहासिक महत्व पटावे.

२) इतिहासाची आवड लोकांमध्ये निर्माण व्हावी व इतिहासप्रेमींनी त्या दृष्टीकोणातून अभ्यास करावा.

३) पर्यटनाचे महत्व वाढीस लागुन त्याचा फायदा तालुक्याला व्हावा.

मोगल बादशाह औरंगजेबाच्या मृत्युनंतर मराठेशाहीमधील एक प्रबळ सरदार 'रंभाजीराव निंबाळकर' हा शाहूस सोडून निजामास येऊन मिळाला म्हणून निजाम उल्मुल्क ने सन १७१३ साली रंभाजी निंबाळकरास 'रावरंभा' अशी पदवी देऊन सन्मानित केले तसेच जहागिरी म्हणून परांडा, नळदूर्ग, तुळजापूर इत्यादी ठिकाणी दिली. रंभाजी

निंबाळकर हा पराक्रमी व फौजबंद सरदार होता. 'रंभा बंडावाला' अशी त्यांची ख्याती होती कारण ते मोगली प्रदेशांची लुटालुट करत होते १.

'रावरंभा' हा किताब मिळाल्यानंतर हे घराणे इतिहासात 'रावरंभा निंबाळकर' या नावाने ओळखले जाऊ लागले या निंबाळकरांच्या चार पिढ्यांनी जहागिरीचा उपभोग घेतला. यामधला शेवटचा सरदार 'रावरंभा निंबाळकर' हा होता. त्याचे नावच मुळ 'रावरंभा' असे होते. हैद्रबादमध्ये चारमिनार जवळ असाणारा त्यांचा वाडा आजही 'राजा रावरंभा निंबाळकर की देवडी' म्हणून प्रसिध्द आहे २.

आज आपण पाहतो ती करमाळ्याच्या जुन्या कोर्टाची ऐतिहासिक इमारत म्हणजे नवीन इमारत बांधण्यापूर्वी या ऐतिहासिक इमरातीमध्ये कोर्टाचे कामकाज चालत असे. ती ऐतिहासिक इमारत ही जानोजी निंबाळकरांनी स्वतःच्या वास्तव्याकरिता बांधलेला एक खास मोठा वाडा होता. जानोजीरावांनी या वाड्यात दीर्घकाळ वास्तव्य केले होते. या वाड्याजवळच 'कारंजे' या नावाने ओळखली जाणारी एक पुष्करणी आहे. यामध्ये दोन्ही बाजूनी आत उतरण्यासाठी पाय-या असून यात राज परिवाराच्या स्नानासाठी केलेली दालने आहेत. राजघराण्यातील स्त्रियांना येथे स्नानाला जाण्यासाठी वाड्यातून एक भुयारी रस्ता आहे. तो थेट पुष्करणीपर्यंत तयार केलेला आहे. या करमाळा शहरामध्ये अस्तित्वात असणारा भुईकोट किल्ला (आज काही भागच त्याचा शिल्लक राहीलेला आहे.) हा भुईकोट किल्ला १८ बुरुजांनी युक्त आहे. जानोजीरावांचा वाडा ही या किल्ल्यात होता. त्यांनीच कमलाभवानीचे मंदिरही बांधलेले आहे ३.

करमाळ्यातील सुप्रसिध्द असे कमलाभवानीचे मंदिर हे प्रचंड खर्च करुन त्यांनी बांधलेले आहे. तसेच ते वैशिष्ट्यपूर्ण असे आहे. त्या मंदिराची शैली ही संमिश्र स्वरुपाची आहे. म्हणजेच घुमट आणि गोपूरे होय. '९६' या अंकाची खास ओळख या मंदिराने जपलेली आहे. त्यावेळी करमाळा तालुक्यामध्ये एकूण खेडी ही ९६ होती आणि म्हणून या मंदिराच्या कळसावरील शिल्पचित्रे ही ९६ आहेत. ज्यावर मुख्य देवालय आधारलेले आहे त्या खांबांची संख्या सुध्दा ९६ आहे तसेच दिपमाळा, ओव-या आणि हत्तीबारवेच्या पाय-यासुध्दा ९६ च आहेत ४.

कमालाई मंदिराजवळ जी हत्तीबारव आहे या बारवेवर 'हत्तीची मोट' ही केवळ आख्यायिका वाटते परंतू मोटेची जागा पाहिल्यानंतर मात्र त्याविषयीची खात्री पटते. या मोटेचे पाणी वापरण्यासाठी आणि तेथे असलेल्या आनंद बागेसाठी वापरले जात होते असे सांगितले जाते. या बारवे विषयी असेही सांगितले जाते की, कमलादेवीच्या मंदिरापेक्षा जास्त खर्च या बारवेला झाला आहे. याची खात्री ही बारव पाहिल्यानंतर लक्षात येते. श्रीमती काशीबाई कानिटकर यांच्या आत्मचरित्रात या विषयीचा खात्रीशीर पूरावा मिळतो. त्यांचे पती सन १८९१ - ९३ या काळात गोविदराव कानिटकर हे करमाळ्यास सबजज्ज म्हणून काम पाहत होते. त्या काळातील आठवणी लिहिताना 'बदलीची आणखी काही गावे' यामध्ये ह्या बारवेचा आणि मोटेचा उल्लेख आलेला आहे. अशीही ९६ पाय-यांचा बारव (विहीर) व अशीही हत्तीची मोट महाराष्ट्रात एकमेव असावी ५.

महाराष्ट्रातील पूणे, सोलापूर, उस्मानाबाद, अहमदनगर आणि बीड इत्यादी जिल्ह्यांच्या ब-याच मोठ्या प्रदेशांवर रावरंभा निंबाळकर घराण्याचे राज्य होते. निंबाळकर वंशजांनी सुमारे दिडशे वर्ष या प्रदेशावर आपला अंमल चालविला ६.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर सन १९५२ मध्ये रावरंभाच्या घराण्याच्या वंशज असणा-या श्रीमती ताराराणी निंबाळकर ह्या काँग्रेस बाँम्बे लेजिस्लेटिवकडून विधानसभा सदस्य म्हणून निवडून आल्या होत्या ७.

दोन वर्षापूर्वी प्रदर्शित झालेला 'सैराट' या मराठी चित्रपटाने संपूर्ण महाराष्ट्राला वेड लावले. या चित्रपटामुळे करमाळा तालुका हा प्रसिध्दीच्या झोतात आला त्यामुळे करमाळा तालुक्यातील जी जी ठिकाणे चित्रपटात दाखविण्यात

**आली ती पाहण्यासाठी लोकांची उत्सुकता वाढली व यातूनच लोकांचा ओढ हा करमाळ्याकडे वाढू लागला. कमलाई देवीचे मंदिर, ९६ पाय-यांची विहीर(बारव), दिपमाळ, वेस व सातविहीर हे पाहण्यासाठी दिवसेंदिवस गर्दी होत आहे आणि ही गोष्ट पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाची ठरत आहे. तसेच करमाळा तालुक्यातील काही गावांना ऐतिहासिक परंपरा आहे. 'पर्यटनक्षेत्र' म्हणून जर नावारुपाला आले तर ऐतिहासिकदृष्ट्या जी गावे महत्वाची आहेत ती लोकांना माहित होतील तसेच पर्यटनाच्यादृष्टीने हे फायदेशीर ठरणार आहे. अशाच काही गावांचा इतिहास मी पुढीलप्रमाणे देत आहे.**

### १) जिंती -

**या गावाला ऐतिहासिकदृष्ट्या महत्व आहे याठिकाणी 'मकुबाई' यांची समाधी आहे. त्यांच्या या नावावरुनच 'मकाई' सहकारी साखर कारखाना चालु आहे. मकुबाईच्या समाधीची देखभाल तेथील राजे भोसले हे पाहतात. त्या समाधीचा इतिहास असा आहे की, छत्रपती शिवाजी महाराजांचे थोरले बंधू संभाजी कनकगिरीच्या मोहिमेवर गेले असता तेथे मारले गेले. त्यांचा मुलगा उमाजी त्याची पत्नी मकुबाई हे जिंती या गावी शेवटपर्यंत राहीले उमाजींना जिंती ही परंपरागत जहागिरी मिळाली होती. आजही जिंती येथे राजे भोसले या नावाने त्यांचे वंशज राहतात.**

### २) वरकूटे मुर्तीचे -

**या गावाची ओळख ही वरकूटे मुर्तीचे म्हणून आहे. कारण या गावामध्ये प्राचीन काळामधील मुर्ती आहे. त्यांचे जतन व संवर्धन व्हावे म्हणून एका सभागृहामध्ये त्या मुर्ती ठेवेलेल्या आहेत.**

### ३) पोथरे -

**करमाळा तालुक्यातील 'पोथरे' या गावी मध्ययुगीन शनिचे मंदिर आहे. ते जिल्ह्यामध्ये प्रसिध्द आहे. दर शनिवारी येथे लोकांची गर्दी असते. या मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे या मंदिरापासून निघालेला भुयारी मार्ग कमलाईदेवीच्या मंदिरापर्यंत निघतो.**

### ४) केम -

**प्राचीन काळापासून 'केम' या गावामध्ये कुंकवाचे कारखाने आजतागायत आहेत. या ठिकाणी मोठमोठे वाडे आहेत आणि त्याठिकाणी कुंकू तयार केले जाते. हे कुंकू देशातील विविध ठिकाणच्या तिर्थक्षेत्र याठिकाणी पाठविले जाते. त्यांच्या कुंकूला जास्त मागणी आहे त्यामुळे ते जास्तीत जास्त तयार केले जाते.**

### ५) संगोबा -

**दरवर्षी महाशिवरात्रीला याठिकाणी महादेवाची मोठी यात्रा भरते तालुक्यातुन तसेच आसपासच्या गावाहून मोठ्या प्रमाणावर भाविक येथे दर्शनासाठी येत असतात. ही यात्रा दोन ते तीन दिवस चालते या यात्रेच्या वेळी भजन किर्तनही असते. करमाळा बस डेपोच्या जादा बसेस याठिकाणी तीन चार दिवस सोडल्या जातात. हे मंदिर नदिच्या काठी आहे. सीना व कानवळा या दोन नद्यांच्या संगमावर असेलेले हे मंदिर कमलाई देवीच्या मंदिराच्या दिपमाळावरुन दिसते हे त्याची वैशिष्टे आहे.**

### ६) चिखलठाण -

**या ठिकाणी 'चिखलस्थ' या ऋषींची तेथे समाधी आहे. त्या समाधीवर त्यांचे नाव कोरलेले आहे आणि त्यांच्याच नावावरुन गावाचे नाव चिखलठाण पडले आहे असे सांगितले जाते.**

या ठिकाणी कोटलिंग देवस्थान आहे दरवर्षी एप्रिल महिन्यात कालाष्टमीच्या दिवशी यात्रा भरते ती पुढे तीन दिवस चालू असते. भव्यदिव्य स्वरुपाची ही यात्रा असते. मंदिराचा परिसर अतिशय निसर्गरम्य असून तिन्ही बाजूने पाण्याने वेढलेले आहे. या यात्रेसाठी गावातील सर्व जाती धर्माचे लोक मोठ्या संख्येने सहभागी होतात.

या ठिकाणी एक नवीन प्रथा सुरु झाली आहे. ती म्हणजे गोळा झालेला निधी हा अन्नदान आणि मंदिर विकासाच्या कामी खर्च केला जातो. दर रविवारी हे मंदिर खुले ठेवले जाते. यावेळी भरपूर लोक मंदिरास भेट देतात. मंदिर परिसर निसर्गरम्य असल्यामुळे येथे माकडांची संख्या भरपूर आहे. करमाळा डेपोने येण्यासाठी रविवारी एसटीची सोय केली आहे.

## समारोप :-

अशा प्रकारे पर्यटनाच्या दृष्टीने भौगोलिक पर्यटनस्थळ ज्याप्रमाणे विशिष्ठ भौगोलिक महत्वामुळे विकसीत होतात तसे ऐतिहासिक स्थाने ही सुध्दा ऐतिहासिक महत्वामुळे विकसित होत असतात.

## संदर्भसूची :-


१) देशमुख गोपाळराव सोलापूर जिल्ह्याचा इतिहास, दुसरी आवृत्ती - २०१२, कौशल्या प्रकाशन, सोलापूर, पृष्ठ क्र. - १०८

२) बिडवे अनिरुध्द, ऐक महाराष्ट्रा, प्रकाशक अनिल फडके, प्रथमावृत्ती जुलै २०००, पृष्ठक्र. - ८

३) संपादक चिवटे महेश, आई कमलाभवानी आणि करमाळ्याचा संक्षिप्त इतिहास, प्रथमावृत्ती ५ ऑक्टोबर २०१३ पृष्ठ क्र. - ८४,

४) तत्रैव, पृष्ठक्र. - ५४

५) बिडवे अनिरुध्द बखर रावरंभाची, प्रथमावृत्ती, जानेवारी २०००, पृष्ठक्र. - ४७

६) तत्रैव, पृष्ठक्र. - ४१

७) तत्रैव, पृष्ठक्र. - ३९